थो | ड | क्या | त
महत्त्वाचे

आंबा आणि काजूच्या बागेला आग

कणकवली : मुंबई गोवा महामार्गावर ओसरगाव येथील हॉटेल शर्मिला नजीक काजू, आंबा बागेला अचानक आग लागली. या आगीत बागायतदार शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. मंगळवारी दुपारच्या सुमारास ही आग लागली. काजू, आंबा बागायतीस लागलेली आग लक्षात येताच ओसरगाव माजी उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते बबली राणे व स्थानिक ग्रामस्थांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली. उपलब्ध साधनांनी आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले, परंतु भर दुपारच्या उन्हात आगीचा भडका आणखी उडाल्यामुळे आग आटोक्यात येत नव्हती.

कोटीतीर्थ तलावात मासे मृत

कोल्हापूर: कोटीतीर्थ तलावातील मोठे मासे मंगळवारी अचानक मृत्युमुखी पडले. येथील नागरिकांनी मासे पाण्याबाहेर काढले. प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाण्याचे नमुने तपासले असता त्यात डिझॉल ऑक्सिजनचे प्रमाण ५ टक्क्यांपेक्षा जास्त होते. त्यामुळे मोठ्या आकाराचे मासे मृत कसे झाले, हे अद्यापही अस्पष्ट आहे. अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, महापालिका पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली.

पोलीस अधीक्षक तेजस्विनी सातपुते ईडीच्या रडारवर?

आमदार राजेंद्र राऊतांचे अधिवेशनात गंभीर आरोप

वार्ताहर/कराड

सातारा जिल्ह्याच्या तत्कालीन पोलीस अधीक्षक व सध्या सोलापूर ग्रामीणच्या पोलीस अधीक्षक तेजस्विनी सातपुते यांच्या विरोधात सोलापूर जिल्ह्यातील बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी विधिमंडळाच्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्या अवैध धंद्यांतून हप्ते घेत असल्याचा आरोप करत त्यांच्या कार्यपद्धतीविरुद्ध आवाज उठवला आहे. सातपुते या अवैध धंद्यांना मदत करून हप्ते गोळा करतात आणि आपल्या अधिकाराचा गैरवापर करून गुन्हेगारांना पाठीशी घालतात, तसेच गुन्हेगारांच्या विरोधात तक्रार करणाऱ्यावरच खोटे गुन्हे दाखल करण्याची भीती घालून त्रास देतात, असे गंभीर आरोपही केले आहेत. त्यांच्यामुळे सोलापूर ग्रामीणमध्ये अवैध दारू, गुटखा, वाळू तस्करीचे प्रमाण वाढून गुन्हेगारी वाढली असून त्याला सर्वस्वी त्याच जबाबदार असल्याने पोलीस अधीक्षक तेजस्विनी सातपुते यांची सखोल चौकशी करून कारवाई त्यांच्यावरती तातडीने कारवाई करावी, असे विधिमंडळ अध्यक्षांच्या पुढे प्रश्न उपस्थित करून लेखी तक्रार केली आहे.

दरम्यान, नैतिकदृष्ट्या गैरवर्तणूक तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे असलेली तक्रार अशा गंभीर आरोपांमुळे साताऱ्याचे तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक धीरज पाटील यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईला ११ दिवस झाले असताच सातारच्या तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्विनी सातपुते यांच्यावरील आरोपांमुळे सातारा जिल्ह्यात हेच अधिकारी कार्यरत असतानाही त्यांनी असेच उद्योग केले असणार अशी शंका व्यक्त केली जात आहे.

साताऱ्याच्या तत्कालीन पोलीस अधीक्षक व सध्या सोलापूर ग्रामीणच्या पोलीस अधीक्षक असलेल्या तेजस्विनी सातपुते यांच्या विरोधात आमदार राजेंद्र राऊत यांनी विधिमंडळ अध्यक्षांसमोर प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे, सातपुते या अवैध धंद्यांना मदत करून हप्ते गोळा करतात आणि आपल्या अधिकाराचा गैरवापर करून गुन्हेगारांना पाठीशी घालतात. सातारा जिल्ह्यात कार्यरत असताना त्यांनी कराडमधील एका व्यक्तीवर खोटा गुन्हा दाखल केला होता तर सातारच्या एका व्यापाऱ्याला मोक्का लागला असताना तडजोड करून तो काढून टाकल्याचा आरोपही त्यांच्यावर आहे.

तसेच त्यांच्या विरोधात न्यायालयाबरोबरच महाराष्ट्र राज्य पोलीस प्रधिकरणाच्या न्यायालयातही केसेस सुरू आहेत. अशा अधिकाऱ्यांची पोलीस विभागातील कारकिर्दीची ईडी आणि सीबीआयतर्फे चौकशी करावी, अशी मागणीच राजेंद्र राऊत यांनी केली आहे.

जलयुक्त शिवार घोटाळाप्रकरणी चार जणांना अटक

बीड : बीडमधील बहुचर्चित अशा जलयुक्त शिवार योजना घोटाळ्याप्रकरणी बीडमधील परळी पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. महत्त्वाचे म्हणजे अटक करण्यात आलेल्या चौघांमध्ये दोन विद्यमान कृषी सहाय्यकदेखील आहेत. तर इतर दोघेजण हे निवृत्त कृषी अधिकारी असल्याचे समजते. परळी पोलिसांनी सध्या कृषी सहाय्यक म्हणून कार्यरत असणाऱ्या पांडुरंग जंगमे, अमोल कराड यांना अटक केली आहे. तसेच दोन निवृत्त तालुका कृषी अधिकारी विजयकुमार भताने, शिवाजी हजारे यांना अटक केली आहे.

The spirit of Mumbai is now 93 years old!

THE FREE PRESS JOURNAL

www.freepressjournal.in

जाहीर सूचना

सूचना याद्वारे आम जनतेस देण्यात येते की, मे. एएसके कॉर्पोरेशन, भागीदारी संस्था यांनी **फ्लॅट क्र. २८१३, २८ वा मजला, मोजमापित १४५.१७ चौ. मीटर अर्थात १५६२.६१ चौरस फुट व फ्लॅट क्र. ३४१४, ३४ वा मजला, मोजमापित १०१.७२ चौ. मीटर अर्थात १०९४.९१ चौरस फुट,** सी विंग, राज इनफिनीया प्रोजेक्ट येथील मालमतेचे आवंटन रद्द केले आहे व त्यानुसार विक्रीचे दि. ३ जून, २०२१ चे करार रद्द केले आहेत व **श्री. असगारवली युसूफअली मोरबीवाला** यांच्या नावे नोंदणीकरण सिरयील क्र. **बीआरएल-६-७४८६-२०२१ व बीआरएल-६-७४८८-२०२१** अंतर्गत दि. ३ जून, २०२१ रोजी नोंदणीकृत केले होते. विक्रीकरिता करारांच्या खंड क्र. (१४) मध्ये संदर्भित सदर फ्लॅट रक्कम म्हणून मंजूर अटी व शर्तीचे अप्रदान केले आहे.

फ्लॅट जागेचे विवरण

सर्व तो भाग फ्लॅट धारक क्र. २८१३, २८ वा मजला, मोजमापित १४५.१७ चौ. मीटर अर्थात १५६२.६१ चौरस फूट व फ्लॅट क्र. ३४१४, ३४ वा मजला, मोजमापित १०१.७२ चौ. मीटर अर्थात १०९४.९१ चौरस फूट, सी विंग, बिल्डींग राज इनफिया म्हणून ज्ञात, गाव वालनाई, तालूका बोरिवली, सीटीएस क्र. ३०७/६६/ए धारक नोंदणीकरण जिल्हा व उप जिल्हा मुंबई येथील भाग.

सर्व व्यक्तींना सदर फ्लॅट व कोणत्याही भागाच्या संबंधात कोणतेही दावे असल्यास तसेच विक्री, भेट, भाडेकरार, धारणाधिकार, प्रभार, न्यास, वारसा, सुविधाधिकार, वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर लेखी स्वरूपात दस्तावेज पुरावे अधोहस्ताक्षरित यांना त्यांचे कार्यालय पत्ता ३१३, मोरया लँड मार्क-१, इनफिनीटी मॉलसमोर, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५३ येथे सदर प्रसिद्धी पासून ७ दिवसांच्या आत सूचित करावे.

दि. १६.०३.२०२२

सही/-
अनिता मौर्या नाईक
मे. एएसके कॉर्पोरेशनकरिता वकील

जाहीर सूचना

ई-सिंडीकेट बँक (सध्या कॅनरा बँक) कुलाबा शाखा सह असलेले पिग्मी खाते धारक तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, आमचे बँकेच्या पिग्मी एजंट श्री. सुरेश वासू अमीन एप्रिल २०२० मध्ये बँकेच्या सेवेतून राजीनामा दिलेली आहे. सदर संदर्भात दावे, काही असल्यास, सदर जाहीर सूचनेच्या ३० दिवसांच्या आत बँककडे सूचित करावा आणि विहित कालावधीच्या समाप्तीनंतर कोणत्याही दावे स्विकारले जाणार नाही.

सही/-
शाखा व्यवस्थापक

भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

मध्यवर्ती कार्यालय : "मरुतागिरी", प्लॉट क्र. १३/९ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३. फोन :- ६१८९०१३४/६१८९००८३

कब्जा सूचना

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार, **भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक २८.१०.२०२१ रोजी मागणी सूचना जारी करून प्रमुख कर्जदार **सौ. फ्लोरी जॉर्ज डिसूझा आणि संयुक्त कर्जदार: श्री. जॉर्ज पीटर डिसूझा** यांना सूचनेतील नमूद रक्कम म्हणजेच **रु. २६,३६,२४५/- (रुपये सव्वीस लाख छत्तीस हजार दोनशे पंचेचाळीस मात्र)** दि. २९.०९.२०२१ रोजीस या रकमेची परतफेड सदर सूचनेच्या प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास सदर कर्जदार असमर्थ ठरल्याने, सदर कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा सांकेतिक ताबा निम्नस्वाक्षरीकारांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ८ अन्वये दिनांक **१४ मार्च, २०२२** रोजी घेतला आहे.

विशेषत: सदर कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. च्या रक्कम **रु. २६,३६,२४५/- (रुपये सव्वीस लाख छत्तीस हजार दोनशे पंचेचाळीस मात्र)** दि. २९.०९.२०२१ रोजीस च्यासह त्यावरील पुढील व्याज या रकमेच्या भाराअधीन राहील.

मिळकतीचे वर्णन

श्री. जॉर्ज पीटर डिसूझा आणि सौ. फ्लोरी जॉर्ज डिसूझा यांच्या द्वारे मालकीचे शिवार गार्डन समोर, मिरा भाईंदर रोड, मिरा रोड (पूर्व), जिल्हा ठाणे-४०१ १०७ येथे स्थित ठाणेच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमधील तालुका आणि जिल्हा ठाणे येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या जुना सर्व्हे क्र. ४९१, नविन सर्व्हे क्र. ८४, हिस्सा क्र. ५(भाग) धारक जमिनीच्या भाग आणि विभागावर बांधकामित गोल्डन व्हॅली को-ऑप.ही.सोसायटी लि. अशा ज्ञात सोसायटी आणि अवनी धाम अशा ज्ञात बिल्डिंगीच्या बी विंग मधील ३ऱ्या मजल्यावरील स्थित फ्लॅट क्र. बी/३०१, मोजमापित अंदाजे ४०.८९ चौ.मीटर्स बिल्टअप क्षेत्र च्यासह शेअर प्रमाणपत्र क्र. ८९ अंतर्गत सोसायटीच्या भांडवल मधील शेअर्स, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध, सिमाबद्ध द्वारे: पूर्व: किंगस्टोन बिल्डिंग, पश्चिम: आयडियल टॉवर, उत्तर: मोकळा प्लॉट, दक्षिण: रोड.

सही/-
दिनांक: १४.०३.२०२२ — **गोपाल कोटियन**
ठिकाण: ठाणे — **मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी**

दी सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

दादर शाखा कार्यालय : गोकुळ निवास क्र. १, कमल इस्टेट, रानडे रोड, दादर पश्चिम, मुंबई ४०० ०२८. दादर शाखा संपर्क क्र. २४३०२१८४/२४३०२१३१

ताबा सूचना

(स्थावर मालमत्तेकरिता)

(सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) (नियम, २००२) च्या नियम ८(१) यांच्यासह सहवाचन परिशिष्ट ४ अनुसार)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरीत दी सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (३/२००२) व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सहवाचिता अनुच्छेद १३ (२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार **श्रीम. रंजना व्ही. कंक व श्री. विवेक कंक** हमीदार अर्थात यांना सदर सूचनेत निर्देशित रक्कम रु. २२,५६,८०६/- (रु. बावीस लाख छप्पन्न हजार आठशे सहा मात्र) व दि. ३१.०१.२०२२ पासूनचे त्यावरील व्याज प्रदान सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी मागणी सूचना दि. १८.०२.२०२१ जारी केली होती.

कर्जदार व प्रतिभूती यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व प्रतिभूती व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर नियमांच्या नियम ९ सहवाचन सदर कायद्याच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. २ सप्टेंबर, २०२२ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व प्रतिभूती यांनी व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे दी सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई यांना प्रभारांतर्गत रक्कम रु. २२,५६,८०६/- (रु. बावीस लाख छप्पन्न हजार आठशे सहा मात्र) व दि. ३१.०१.२०२१ अनुसार त्यावरील व्याज रकमेच्या अधीन असतील.

स्थावर मालमत्तेचे विवरण

४०२, ४ था मजला, सुमित्रा सदन, वारेकर स्कूलच्या समोर, मुंबई देवी कॉलनी रोड, दिवा (पू) मालक श्रीम. रंजना विवेक कंक व श्री. विवेक कंक यांच्या मालकीचे आहे.

वीना केळशीकर
प्राधिकृत अधिकारी
दि. गुरुवार
दि. १७ फेब्रुवारी, २०२२ — **दी सिटी को-ऑप. बँक लि. मुंबई**

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, आम्ही या खालील लिखित परिशिष्टात अधिक तपशीलवारपणे विवर्णीत मिळकत, आणि जे ह्यानंतर सदर मिळकत असा संदर्भित, च्या नामाधिकार तपास करित आहोत.

सदर मिळकतीचे मालक असलेले मे. अमर टी. प्रा.लि. यांनी आम्हाला कळविले की सदर मिळकतीचे काही मूळ नामाधिकार विलेख दिनांकित १९९४ त्यांच्याकडून १३/०३/२०२२ रोजीस हरविलेले आहे, आणि ज्या करिता काळा चौकी पोलीस स्टेशन, मुंबई द्वारा १३/०३/२०२२ च्या पोलीस प्रमाणपत्र क्र ३३७/२०२२ जारी करण्यात आला.

आम्ही हक्कदार, हिंअकु, कंपनी, बँक, वित्तिय संस्था, नॉन-बँकिंग वित्तिय संस्था, व्यक्तिचे मंडळ, न्यास, घटीत किंवा घटीत नसलेले व्यक्तिचे मंडळ, सावकार आणि किंवा धनको समाविष्टित सर्व व्यक्तिंना बोलविण्यात येते की सदर मिळकतीच्या संदर्भात किंवा कोणत्याही भाग किंवा विभागा संबंधी विक्री, समझोत्याच्या ज्ञापन, अदला बदल, गहाण, बचत, प्रभार, बक्षीस, न्यास, वारसा, उत्तराधिकार, ताबा, भाडेपट्टा, कुळवहिवाट, निर्वाह, सुविधाधिकार, परवाना, अंत्यदान, भाग, अभिहस्तांकन, धारणाधिकार, जप्ती, विकास हक्क, प्रलंबित वाद, करार, आरक्षण, एफएसआयचा वापर, किंवा कोणत्याही दायित्व किंवा बंधनकारक, किंवा अन्य काही, किंवा कोणत्याही प्रकारे मागणी च्या मार्गे कोणताही आक्षेप, दावा, हक्क, नामाधिकार आणि किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी ह्या सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये माझ्या खालील नमूद कार्यालयामध्ये निम्नस्वाक्षरीकाराकडे पुष्ठ्यर्थ मुळ दस्तावेजासह लेखी सदर कळविणे याद्वारे विनंती आहे, कसूर केल्यास अशा व्यक्ति किंवा व्यक्तिंचे दावा, मागणी, आक्षेप, हक्क, काही असल्यास, सोडून दिला आणि किंवा त्यागित केला असा मानण्यात येईल.

यामध्ये वरील संदर्भित परिशिष्ट

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत मुंबई शहराच्या नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यामधील परेल शिवडी विभागाच्या सी.एस. क्र. ५-१/१७२, प्लॉट क्र. ८ आणि ९ धारक जमीनीच्या ते सर्व भाग आणि विभागावर बांधकामीत सेंट एडवर्ड रोड, गुप्तावाडी, शिवडी, मुंबई-४०००१५ येथे स्थित टी. के. इंडस्ट्रियल अशा ज्ञात इमारतीच्या तळ मजल्यावर युनिट क्र. ३ ए, मोजमापित अंदाजे २६०९ चौ. फीट, जे २४२.४७ चौ.मी. शी समतुल्य असलेले मिळकत.

मुंबई येथे दिनांकित १६ मार्च, २०२२

सही/-
महेशचंद्र के. ठाकूर वकील,
कार्यालय क्र. ४०१, ४था मजला, मारूती मॅन्शन, १७ रघुनाथ दादाजी स्ट्रिट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

जाहीर सूचना

वरळी कोळीवाडा मालक कम्युनिटी वेल्फेअर को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., सोसायटी नोंदणीकृत असून महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट, १९६० च्या तरतूदी अंतर्गत नोंदणीकरण क्र. एमयूएम/डब्ल्यूजीएस/जीएनएल (ओ)८४५२/२०१५ (सोसायटी), खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत (जमिन) व वरळी तालूका वरळी येथील गाव वरळी कोळीवाडा इस्टेट येथील मुंबई शहरातील कलेक्टरच्या अहवालानुसार महसूल अनुसार वरळी कोळीवाडा इस्टेट योजना ५२, टिका शीट्स क्र. ६०४, ६०५, ६०३, ६०२, ५७२, ५७३, ५७१, ५७०, ५६९, ५३५, ५३६, ५३७, ५३४, ५३३, ५३२ धारक सर्व भागावरील वरळी कोळीवाडा इस्टेट योजना ५२ मधील जमिन धारक सीटीएस क्र. २२४ चे मालक आहेत.

खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत मालमत्तेच्या संबंधात सदर मालमत्ता म्हणून संदर्भित नसलेल्या संपूर्ण जमिन म्हणून मालक यांची जमिन, जमिन धारक नेवी व कोस्ट गार्ड, फोरशोअर जमिन, खुला व जोडलेला ड्रेनेज, प्राधिकरण व अप्राधिकृत झोपडपट्टी, हेरिटेज बफर क्षेत्र, सोशल व पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर व अन्य रचना त्यावरील उभ्या असलेल्या मालमत्ता.

वरळी कोळीवाडा मालक कम्युनिटी वेल्फेअर को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., सदर मालमत्तेच्या पुन:विकासाकरिता पोटेंशल विकासक म्हणून मे. एमडीएम रियाल्टी ग्रुप चे विकास हक्क म्हणून मंजूर करण्याकरिता बोलणीची प्रक्रिया करत आहेत व प्रक्रियेमधील मालक आहेत.

कृपया नोंद घ्यावी की खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत सदर मालमत्तेच्या हक्कांची आमचे अशील पडताळणी करत आहेत.

सर्व व्यक्तींना खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत मालमत्तेच्या संबंधात कोणतेही दावे, हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास तसेच वारसा, शेअर, विक्री, गहाण, प्रभार, न्यास, कर्ज, अदबादल, भेट, भाडेकरार, उप भाडेकरार, धारणाधिकार, परवाना, ताबा, प्री-एम्पशन अधिकार, वैधानिक जप्ती वा अडथळे वा अन्य कोणतेही हक्क वा कोणतेही अन्य करार वा कोणत्याही स्वरूपातचे वा कोणतेही आदेश काही असल्यास अन्यथा काही असल्यास त्यांनी सदर लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना संबंधित दस्तावेज यांच्यासह नोटरीकृत स्वरूपात आमचा पत्ता २०१, न्यु बेक हाउस, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, काळा घोडा, मुंबई ४०० ००१ येथे लेखी स्वरूपात सूचित करावे व तसेच आमचे ई-मेल पत्ता worlikoloc@slassociates.co.in येथे सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा कोणतेही दावे वा आक्षेप असल्यास ते गृहित धरले जाणार नाहीत व काही असल्यास ते अधित्यागीत वा परित्यागीत मानले जातील.

वरील संदर्भित अनुसूची :

सर्व तो भाग व भूखंड असलेल्या जमिन धारक वरळी कोळीवाडा येथील तसेच गाव रहिवासी जागा धारक सीटीएस क्र. २२४ व अन्य मोजमापित ३,१५,४०२ चौ. यार्ड्स वा तयावरील वा समतुल्य क्षेत्रफळ अंदाजे ६५ एकर्स असलेल्या सर्व तो वरळी कोळीवाडा इस्टेट योजना ५२, टिका शीट्स क्र. ६०४, ६०५, ६०३, ६०२, ५७२, ५७३, ५७१, ५७०, ५६९, ५३५, ५३६, ५३७, ५३४, ५३३, ५३२, महसूल गाव कलेक्टर्स मुंबई शहरामधील व मालक यांची जमिन असलेल्या जमिन धारक नेवी व कोस्ट गार्ड येथील जमिन धारक नेवी व कोस्ट गार्ड, फोरशोअर जमिन, खुली जमिन व एनक्लोज्ड ड्रेनेज, प्राधिकरण व अनाधिकृत झोपडी, हेरिटेज बफर क्षेत्र, सोशल व पबिलक इफ्रास्ट्रक्चर येथील गाव वरळी कोळीवाडा इस्टेट, वरळी, तालूका वरळी, नोंदणीकरण जिल्हा व उप जिल्हा मुंबई शहर व मुंबई उपनगरीय असलेल्या रचनांसह त्यावरील सीमा :

उत्तरेस : सी, क्रीक व सी लिंक
दक्षिणेस : आदर्श नगर व एमआयजी कॉलनी
पूर्वेस : सी, जनता कॉलनी व माहिम बे
पश्चिमेस : सी, क्रीक व सी लिंक

दि. १६ मार्च, २०२२

मे. सुजीत लाहोटी ॲन्ड असोसिएट्स
(सुजीत लाहोटी)

जाहिर सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की, श्रीमती धानफूल फुलराज सिंह सदनिका क्रमांक ०२२, आणि १०२, बिल्डिंग नंबर बी/२९, ड्रीम लॅन्ड को. ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड शांति नगर सेक्टर ११ आणि शॉप नंबर ८ आणि ९ बी बिल्डिंग नंबर बी/६ आदेश्वर शांती नगर को. ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड सेक्टर ११, मीरा रोड पूर्व ठाणे ४०१ १०७ या जागेचा मालक आहेत तथापि श्री फुलराज बांशराज सिंह याचे २९-०३-२०१८ रोजी निधन झाले, त्याचे पश्चात कायदेशीर वारसदार त्याची पत्नी श्रीमती धानफूल फुलराज सिंह हे आहेत तथापि सोसायटीने श्रीमती धानफूल फुलराज सिंह यांच्या नावे सदर सदनिका आणि शॉप हस्तांतरण केले आहे जर कोणाही व्यक्तीस काही दावा असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्री पुराव्यासह पी./११ राज एक्झाटिका, ऑपॉजिट गौरव आक्शेलेंसि, मीरा रोड पूर्व ठाणे ४०११०७, येथे सदर सूचनेच्या तारखेपासून १४ दिवसात कळवावे, अन्यथा असे समजले जाईल की, सदर सदनिका आणि शॉप कोणाही व्यक्तीचा कोणताही दावा नाही कृपया याची नोंद घ्यावी.

हरेंद्र बी. जे. सिंह
वकील उच्च न्यायालय

भारत सरकार

वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. I

२रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई७४०० ००५

वसुली अधिकारी यांचे समोर,
मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. I
कार्यवाही क्र. ८४५ सन २०१६

पुढील तारीख: २५.०३.२०२२
नि.: १६

स्टेट बँक ऑफ इंडिया .... **प्रमाणपत्र धारक**

विरुद्ध

स्टर्लिंग जेम्स आणि अन्य .... **प्रमाणपत्र कर्जदार**

प्रतिवादींची मालमत्ता प्रकट करण्यासाठी कारणे दाखविण्यासाठी सूचना

प्रति.

२. **श्री. जयेश बाबुलाल मेहता,** मे. स्टर्लिंग जेम्स, ३०१, श्रीजी दर्शन, टाटा रोड क्र. १, प्रसाद चेंबर्स समोर, ऑपरा हाऊस, मुंबई- ४००००४ येथे व्यवसाय करतात **आणि येथे सुध्दा** राहणार फ्लॅट क्र. २०१, सानिध्य अपार्टमेंट, २२ए, वाळकेश्वर रोड, मुंबई- ४००००६.

३. **श्री. चिराग जयेश मेहता,** मे. स्टर्लिंग जेम्स, ३०१, श्रीजी दर्शन, टाटा रोड क्र. १, प्रसाद चेंबर्स समोर, ऑपरा हाऊस, मुंबई- ४००००४ येथे व्यवसाय करतात **आणि येथे सुध्दा** राहणार फ्लॅट क्र. २०१, सानिध्य अपार्टमेंट, २२ए, वाळकेश्वर रोड, मुंबई- ४००००६.

४. **श्रीम. अमिता जयेश मेहता,** राहणार फ्लॅट क्र. बी/६, अरविंद कुंज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., ७७, ताडदेव रोड, मुंबई- ४०००३४ **आणि येथे सुध्दा** फ्लॅट क्र. २०१, सानिध्य अपार्टमेंट, २२ए, वाळकेश्वर रोड, मुंबई- ४००००६.

ज्याअर्थी वसुली प्रक्रिया क्र. ८४५ सन २०१६ मध्ये सन्मा. वसुली अधिकारी यांनी मागील तीन वर्षाकरिता आय.टी. रिटर्नसह शपथेवर त्यांची मालमत्ता प्रकट करण्यासाठी प्रतिवादी क्र. २ ते ५ यांना निर्देश दिले होते.

ज्याअर्थी तुम्ही दिनांक ०५.०७.२०१६ रोजीच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर केली आहे, तुम्ही सदर आदेशाचे पालन न केल्यामुळे तुम्हाला दिवाणी कारागृहात का ठेवु नये याची कारणे दाखविण्यासाठी २५.०३.२०२२ रोजी दु. १२.०० वा. माझ्या समोर हजर राहणे याद्वारे आवश्यक आहे.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ३ मार्च, २०२२ रोजी दिले.

(अजीत त्रिपाठी)
वसुली अधिकारी, डीआरटी- I,मुंबई

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की कृतिका पी. रायपूर, हि सतिश परवानी यांच्याकडून फ्लॅट क्र. ए-२५०३, २५ वा मजल्यावर, विंग ए, बिल्डिंग क्र. २४, लावण्य सीएचएसएल, हिरानंदानी इस्टेट, पाटलीपाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प.) - ४००६०७ खरेदी करण्यास मान्य केली आहे, ज्यांनी कळविले की तो मयत वीणा परवानी यांचे कायदेशीर वारसदार असून त्याच्या बाजूने सन्मा. न्यायालयाने पारित कयदेशीर वारसदार प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

सर्व व्यक्तींना सदर फ्लॅटवर कोणताही दावा/आक्षेप काही असल्यास लिखित स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना सदर प्रकाशनापासून १० दिवसांच्या कालावधीत कळविणे, कसूर केल्यास अशा व्यक्तींचे दावा/आक्षेप काही असल्यास ते कायमस्वरुपी त्यागित आणि/किंवा परित्यागित केली असा मानण्यात येईल आणि सदर फ्लॅटच्या संदर्भातील कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

१५.०३.२०२२ दिनांकीत., मे. आरती शिंदे ॲण्ड कं., सही/- ऑफिस क्र. ७, ३ रा मजला, साई सदन, ६८, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - १.

जाहिर सूचना

जनतेला याद्वारे सूचना देण्यांत येते की, सौ. अरुंधती उपाध्याय यांच्या मालकीच्या येथे खालील परिशिष्टांत सविस्तर वर्णन लिहिलेल्या मिळकतीच्या खरेदीसाठी माझे अशील वाटाघाटी करत आहेत.

सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही हिश्यांच्या संबंधात किंवा विरुद्ध विक्री, अदलाबदल, गहाण, भार, दान, न्यास, वारसा, कब्जा, भाडेपट्टा, धारणाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही आक्षेप किंवा दावा असलेल्या सर्व व्यक्तींनी कृपया तसे लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या कार्यालयांत डीबीएस हाऊस, घनश्याम तलवटकर मार्ग, ओल्ड प्रेस्कॉट रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे अशा आक्षेप किंवा दाव्याचा पुष्ठ्यर्थ दस्तावेजांसह ह्या तारखेपासून १४ दिवसात सदर कळवावे, कसूर केल्यास अशा व्यक्तींचे असे कोणतेही आक्षेप किंवा दावे सोडून दिल्याचे आणि/ किंवा त्यागल्याचे गृहीत धरले जाईल.

वरील संदर्भातील परिशिष्ट :

बृहमुंबई महानगर पालिकेच्या जी/साऊथ वॉर्ड च्या हद्दीतील जिल्हा मुंबई मधील लोअर परळ विभागाच्या कॅडेस्ट्रल सर्व्हे क्र.१/४४५ धारक जमिनीवरील शंकरराव नरम मार्ग, ऑफ पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०००१३ येथे स्थित ''लोटस रेसिडेन्सी'' नावाच्या इमारतीच्या ''ए'' विंग मधील १५व्या (पंधराव्या) मजल्यावरील प्लॉट क्र. १५०४, २(दोन) कार पार्कींग स्पेसेस आणि जोडलेल्या टेरेस गार्डनचा निर्विवाद वापर करण्याच्या अधिकारांसह एकत्रित.

दिनांक : १४ मार्च, २०२२

सही/-
(विनोद एल देसाई)
इच्छुक खरेदीदारांसाठी वकील

वर्तमानपत्र जाहीरात फॉर्म नं.

फॉर्म नं. - १५

[एलएलपी ॲक्ट, २००८ च्या कलम १३ (३) सहवाचता एलएलपी रुल्स, २००९ च्या नियम १७ पुसार]

लर्नर्स टेक्नॉलॉजी एलएलपी (पूर्वीचे नाव आर्क लर्निंग्ज एलएलपी) (एएडब्ल्यु-३६८८)

ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय आहे - ४०१/४०२, संदीप बंगलो, जय हींद सोसायटी, १० वा रोड, विलेपार्ले पश्चिम, मुंबई-४०० ०५६ (महाराष्ट्र)

एक राज्यातून अन्य राज्यात एलएलपीचे नोंदणीकृत कार्